Now therefore, in exercise of powers conferred by sub-section *(2)* of Section 37 of the said Act, the Government of Maharashtra hereby sanctions the Proposed Modification and for that purpose directs that, in the Schedule of Modifications appended to the said Notification, after the last entry, the following new entry shall be added *viz.* :–

ENTRY

Sanction is accorded under Section 37*(2)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 to the Modification proposal submitted by the Pandharpur Municipal Council to change the designation of the Site No. 32, "Civic Center" upto the extent of area admeasuring about 2000 sq.mtrs. out of the total area 5600 sq.mtrs. of the said Site No. 32, Civic Center on the land bearing C.T.S. No. 4000 (Part), in the Development Plan of Pandharpur Municipal Council and to re-disgnate the said 2000 sq.mtrs. area as a Cultural Center and silmultineously to the new 12 mtrs. vide DP Road is also sanctioned for the approach to the said reservation of Civic Center from the existing road as shown on Plan "

The Part Plan, Bearing No. TPS-1825/56/CR.No.59/2025/UD-13, showing the above sanctioned modification shall be kept open for inspection by the general public during office hours in the office of the Chief Officer, Pandharpur Municipal Council, Pandharpur, District Solapur for a period of one month.

This Notification shall also be published on the Government web-site **www.maharashtra.gov.in.**

By Order and in the name of the Governor of Maharashtra,

PRANAV KARPE,
Under Secretary,
Government of Maharashtra.

नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक ९ जून २०२५

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.

अधिसूचना

क्रमांक टीपीएस-१९१२/१६०/प्र.क्र.४०/१२/वि.यो. मंजुरी/पूरकपत्र/नवि-१३.— ज्याअर्थी, महाबळेश्वर नगरपरिषद (जिल्हा सातारा) (यापुढे उक्त "नियोजन प्राधिकरण" म्हणून संबोधले आहे), हे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (महाराष्ट्र अधिनियम क्र. XXXVII of १९६६) (यापुढे "उक्त अधिनियम" म्हणून संबोधले आहे) चे कलम २ *(१९)* नुसार तिच्या कार्यक्षेत्रात नियोजन प्राधिकरण असून, उक्त नियोजन प्राधिकरणाने दिनांक १५ सप्टेंबर २००१ रोजी ठराव क्रमांक १६१ *(१)* द्वारे उक्त अधिनियमाच्या कलम २३, सहकलम ३८ अन्वये

महाबळेश्वर नगरपरिषदेच्या हद्दीतील क्षेत्रासाठी प्रारूप विकास योजना (दुसरी सुधारित) (यापुढे "उक्त दुसरी सुधारित विकास योजना" म्हणून संबोधले आहे) तयार करण्याचा आपला उद्देश घोषित केला असून, अशा घोषणेबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र (यापुढे "अधिकृत राजपत्र" म्हणून संबोधले आहे) भाग एक--पुणे विभागीय पुरवणीमध्ये, दिनांक ८ नोव्हेंबर २००१ रोजी, पृष्ठे २४२६ वर प्रसिद्ध करण्यात आली आहे ;

ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने, उक्त दुसऱ्या सुधारित विकास योजनेच्या अनुषंगाने आवश्यक ती संपूर्ण वैधानिक कारवाई पूर्ण करून उक्त अधिनियमाच्या कलम ३० *(१)* अन्वये, उक्त दुसरी सुधारित विकास योजना उक्त नियोजन प्राधिकरणाने दिनांक ३० मार्च २०१२ रोजी पत्र क्रमांक १५/४८५/२०११-२०१२ अन्वये शासनास मंजुरीसाठी सादर केली आहे ;

आणि ज्याअर्थी केंद्र शासनाचे पर्यावरण व वने मंत्रालयाकडील दिनांक १७ जानेवारी २००१ च्या अधिसूचनेनुसार (यापुढे "उक्त अधिसूचना" म्हणून संबोधले आहे) महाबळेश्वर-पांचगणी क्षेत्र हे पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील प्रदेश म्हणून अधिसूचित करण्यात आलेले असून उक्त अधिसूचनेतील अ.क्र. २ (a) (iii) नुसार राज्य शासनाने महाबळेश्वर परिषद क्षेत्रासाठी सब झोनल मास्टर प्लॅन (विकास योजना) तयार करून त्यास प्रथम केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयासोबत सल्ला मसलत करणे आवश्यक होते ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३१ *(१)* मधील तरतुदीनुसार शासनाचे नगर विकास विभागाने अधिसूचना क्र. टीपीएस-१९१२/१६०/प्र.क्र.४०/१२/वि.यो. मंजुरी/नवि-१३, दिनांक २८ मार्च २०१३ अन्वये उक्त नियोजन प्राधिकरणाच्या उक्त दुसऱ्या सुधारित विकास योजनेस केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाची सहमती घेण्याच्या अटीवर भागश: मंजुरी देण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने अधिसूचना क्र. २८२० (ई), दिनांक १६ जून २०२२ रोजी पारित केलेल्या अधिसूचनेनुसार केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिनांक १७ जानेवारी २००१ च्या मूळ अधिसूचनेतील मुद्दा क्र. २ (a) (iii) मध्ये केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण मंत्रालयाच्या मंजुरीच्या अनुषंगाने सुधारणा केली आहे. (यापुढे जिचा उल्लेख "उक्त सुधारणा" असे संबोधिले आहे) ;

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाकडील अधिसूचना क्र. २८२० (ई), दिनांक १६ जून २०२२ अन्वये करण्यात आलेल्या उक्त सुधारणेनुसार, तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचाशी सल्लामसलत केल्यानंतर उक्त दुसऱ्या सुधारित विकास योजनेकरिता शासनाच्या नगर विकास विभागाने दिनांक २८ मार्च २०१३ रोजी पारित केलेल्या अधिसूचनेस उक्त दुसरी सुधारित विकास योजना अंमलबजावणीकरिता तारीख निश्चित करण्याचे दृष्टीने पूरकपत्र निर्गमित करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे ;

आता ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१ *(१)* मधील तरतुदीनुसार शासनास प्राप्त झालेले अधिकारामध्ये, तसेच इतर अनुषंगिक असलेल्या शक्तींचा वापर करून शासनाच्या नगर विकास विभागाने दिनांक २८ मार्च २०१३ रोजी पारित केलेल्या अधिसूचनेस पूरकपत्र निर्गमित करण्यात येत असून उक्त दिनांक २८ मार्च २०१३ रोजीचे अधिसूचनेच्या शेवटी तळटीप क्र. ६ चे नंतर खालीलप्रमाणे नवीन तरतूद समाविष्ट करण्यात येत आहे :--

दिनांक २८ मार्च २०१३ रोजीचे अधिसूचनेमधील तळटीप क्र. ७ :--

"महाबळेश्वर नगरपरिषदेच्या (भागश: क्षेत्राची) दुसरी सुधारित मंजूर विकास योजनेची अंमलबजावणीबाबतची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये उक्त अधिसूचना प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून ३० दिवसानंतरची तारीख ही उक्त भागश: क्षेत्राची दुसरी सुधारित मंजूर विकास योजना अमलात आल्याची तारीख म्हणून निश्चित करण्यात येत आहे."

सदर अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे व नियम) या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

प्रणव कर्पे,
अवर सचिव,
महाराष्ट्र शासन.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai-400 032

Dated 9th June 2025

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

NOTIFICATION

No. TPS-1912/160/C.R.-40/12/D.P.Sanction/UD-13.— Whereas, the Mahabaleshwar Municipal Council (District Satara) (hereinafter referred to as “the said Planning Authority”), being the Planning Authority within its jurisdiction under clause *(19)* of Section 2 of the Maharashtra Regional and Town

Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to "the said Act"), *vide* its Resolution No. 161 *(1)* dated 15th September 2001 declared its intention under Section 23, read with Section 38 of the said Act to prepare Draft Development Plan (2nd Revision) for the area within the limits of the Mahabaleshwar Municipal Council (hereinafter referred to as the "said Second Revised Development Plan") and Notice of such declaration was published at Page No. 2426 in the Maharashtra Government Gazette (hereinafter referred to as the "Official Gazette"), Part 1--Pune Divisional Supplement, dated 8th November 2001 ;

and whereas, the said Planning Authority, after completing all the required statutory procedures for the said Second Revised Development Plan, submitted the said Second Revised Development Plan to the Government for its sanction under Section 30 *(1)* of the Act, *vide* Letter No. 15/485/2011-2012, dated 30th March 2012 ;

and whereas, as per the Notification dated 17th January 2001 (hereinafter referred to "the said Notification") issued by the Ministry of Environment and Forests, Government of India, the Mahabalehwar-Panchgani region has been declared an Environmentally Sensitive Zone, and under the Clause No. 2 (a) (iii) of the said Notification, it was necessary for the State Government to prepare a Sub-Zonal Master Plan (Development Plan) for the Mahabaleshwar Council area with prior concurrence of the Ministry of Environment and Forests, Government of India ;

and whereas, as per the provision of Section 31 *(1)* of the said Act, the Urban Development Department of the Government *vide* Notification No. TPS-1912/160/C.R.40/12/DP Sanction/UD-13, dated 28th March 2013, has sanctioned to the part area of the said Second Revised Development Plan of the said Planning Authority subject to the condition to obtain the consent from the Ministry of Environment and Forests, Government of India ;

and whereas, the Ministry of Environment and Forests, Government of India, through Notification No. 2820 (E), dated 16th June 2022, amended clause 2 (a) (iii) of the original Notification dated 17th January 2001 accordingly (hereinafter referred to "the said Amendment") ;

and whereas, pursuant to the amendment in Notification No. 2820 (E), dated 16th June 2022, the Ministry of Environment and Forests, Government of India and after consultation with the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that it is necessary to issue a Addendum to the Notification dated 28th March 2013 in respect of confirmation to the date of implementation to the said Second Revised Development Plan ;

Now therefore, in accordance with the provisions of Section 31 *(1)* of the said Act and in Leo of the said amendment made under Notification No. 2820(E), dated 16th June 2022, issued by the Ministry of Environment and Forests, Government of India, and by exercising the powers conferred under Section 31 *(1)* of the said Act and also with other relevant powers, the Government hereby the addendum to the Notification dated 28th September 2013 by the Government in Urban Development Department and for that purpose the following new provision is included after the Foot Note Sr. No. 6 of the said Notification dated 28th March 2013 ;

Foot Note Sr. No. 7 of the Notification dated 28th March 2013 :–

The Second Revised Sanctioned Development Plan (part area) of the Mahabaleshwar Municipal Council sanctioned by the said Notification shall come into effect after 30 days from the date of publication of the said Notification in respect of the implementation in the Maharashtra Government Gazette shall be considered as the date on which the said second revised sanctioned Development Plan for the part area comes into effect.

This Notification is also made available on the Government of Maharashtra's website **www.maharashtra.gov.in** under the Section Laws and Rules.

By Order and in the name of the Governor of Maharashtra,

PRANAV KARPE,
Under Secretary,
Government of Maharashtra.

नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक ९ जून २०२५

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.

अधिसूचना

क्रमांक टीपीएस-१९१२/१६०/प्र.क्र.४०/१२/ई.पी.मंजुरी/पूरकपत्र/नवि-१३.— ज्याअर्थी, महाबळेश्वर नगरपरिषद (जिल्हा सातारा) (यापुढे उक्त "नियोजन प्राधिकरण" म्हणून संबोधले आहे), हे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (महाराष्ट्र अधिनियम क्र. XXXVII of १९६६) (यापुढे "उक्त अधिनियम" म्हणून संबोधले आहे) चे कलम २ *(१९)* नुसार तिच्या कार्यक्षेत्रात नियोजन प्राधिकरण असून, उक्त नियोजन प्राधिकरणाने दिनांक १५ सप्टेंबर २००१ रोजी ठराव क्रमांक १६१ (१) द्वारे उक्त अधिनियमाच्या कलम २३, सहकलम ३८ अन्वये महाबळेश्वर नगरपरिषदेच्या हद्दीतील क्षेत्रासाठी प्रारूप विकास योजना (दुसरी सुधारित) (यापुढे "उक्त दुसरी सुधारित विकास योजना" म्हणून संबोधले आहे) तयार करण्याचा आपला उद्देश घोषित केला असून, अशा घोषणेबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र (यापुढे "अधिकृत राजपत्र" म्हणून संबोधले आहे) भाग एक--पुणे विभागीय पुरवणीमध्ये दिनांक ८ नोव्हेंबर २००१ रोजी पृष्ठ २४२६ वर प्रसिद्ध करण्यात आली आहे ;

ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने, उक्त दुसऱ्या सुधारित विकास योजनेच्या अनुषंगाने आवश्यक ती संपूर्ण वैधानिक कारवाई पूर्ण करून उक्त अधिनियमाच्या कलम ३० *(१)* अन्वये, उक्त दुसरी सुधारित विकास योजना उक्त नियोजन प्राधिकरणाने दिनांक ३० मार्च २०१२ रोजी पत्र क्रमांक १५/४८५/२०११-२०१२ अन्वये शासनास मंजुरीसाठी सादर केली आहे ;

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाचे पर्यावरण व वने मंत्रालयाकडील दिनांक १७ जानेवारी २००१ च्या अधिसूचनेनुसार (यापुढे "उक्त अधिसूचना" म्हणून संबोधले आहे) महाबळेश्वर-पांचगणी क्षेत्र हे पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील प्रदेश म्हणून अधिसूचित करण्यात आलेले असून उक्त अधिसूचनेतील अ. क्र. २ (a) (iii) नुसार राज्य शासनाने महाबळेश्वर परिषद क्षेत्रासाठी सब झोनल मास्टर प्लॅन (विकास योजना) तयार करून त्यास प्रथम केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयासोबत सल्ला मसलत करणे आवश्यक होते ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३१ *(१)* मधील तरतुदीनुसार शासनाचे नगर विकास विभागाने अधिसूचना क्र. टीपीएस-१९१२/१६०/प्र.क्र.४०/१२/वि.यो.मंजुरी /नवि-१३, दिनांक २८ मार्च २०१३ अन्वये उक्त नियोजन प्राधिकरणाच्या उक्त दुसऱ्या सुधारित विकास योजनेस केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाची सहमती घेण्याच्या अटीवर भागश: मंजुरी देण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाचे नगर विकास विभागाने अधिसूचना क्र. टीपीएस-१९१५/१११९/प्र.क्र.३११/१५/ई.पी.मंजुरी/नवि-१३, दिनांक १ मार्च २०१६ चे अधिसूचनेन्वये महाबळेश्वर नगरपरिषदेच्या उक्त दुसऱ्या सुधारित विकास योजनेच्या वगळलेल्या भागाचे सारभूत स्वरूपाच्या फेरबदलांना (ईपी-१ ते ईपी-२२) केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाची सहमती घेण्याच्या अटीवर मंजुरी देण्यात आली आहे (यापुढे "उक्त वगळलेल्या क्षेत्राची दुसरी सुधारित विकास योजना" म्हणून संबोधले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने अधिसूचना क्र. २८२० (ई), दिनांक १६ जून २०२२ रोजी पारित केलेल्या अधिसूचनेनुसार केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिनांक १७ जानेवारी २००१ च्या मूळ अधिसूचनेतील मुद्दा क्र. २ (a) (iii) मध्ये केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण मंत्रालयाच्या मंजुरीच्या अनुषंगाने सुधारणा केली आहे. (यापुढे जिचा उल्लेख "उक्त सुधारणा" असे संबोधिले आहे) ;

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाकडील अधिसूचना क्र. २८२० (ई), दिनांक १६ जून २०२२ अन्वये करण्यात आलेल्या उक्त सुधारणेनुसार, तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याशी सल्लामसलत केल्यानंतर उक्त वगळलेल्या क्षेत्राच्या दुसऱ्या सुधारित विकास योजनेकरिता शासनाच्या नगर विकास विभागाने दिनांक १ मार्च २०१६ रोजी पारित केलेल्या अधिसूचनेस उक्त वगळलेल्या क्षेत्राची दुसरी सुधारित विकास योजना अंमलबजावणीकरिता तारीख निश्चित करण्याचे दृष्टीने पूरकपत्र निर्गमित करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे ;

आता ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१ *(१)* मधील तरतुदीनुसार शासनास प्राप्त झालेले अधिकारामध्ये, तसेच इतर अनुषंगिक असलेल्या शक्तींचा वापर करून शासनाच्या नगर विकास विभागाने दिनांक १ मार्च २०१६ रोजी पारित केलेल्या अधिसूचनेस पूरकपत्र निर्गमित करण्यात येत असून उक्त दिनांक १ मार्च २०१६ रोजीचे अधिसूचनेच्या शेवटी खालीलप्रमाणे नवीन तरतूद क्र. (ड) समाविष्ट करण्यात येत आहे :--

दिनांक १ मार्च २०१६ रोजीचे अधिसूचनेच्या शेवटी समाविष्ट करावयाची तरतूद क्र. (ड)

"महाबळेश्वर नगरपरिषदेच्या (वगळलेल्या क्षेत्राची) दुसरी सुधारित मंजूर विकास योजनेची अंमलबजावणीबाबतची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये उक्त अधिसूचना प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून ३० दिवसानंतरची तारीख ही उक्त (वगळलेल्या क्षेत्राची) दुसरी सुधारित मंजूर विकास योजना अमलात आल्याची तारीख म्हणून निश्चित करण्यात येत आहे."

सदर अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे व नियम) या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

प्रणव कर्पे,

अवर सचिव,

महाराष्ट्र शासन.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai-400 032

Dated 9th June 2025

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

NOTIFICATION

No. TPS-1915/1119/CR-311/15/EP Sanction/UD-13.— Whereas, the Mahabaleshwar Municipal Council (District Satara) (hereinafter referred to as "the said Planning Authority"), being the Planning Authority within its jurisdiction under Clause *(19)* of Section 2 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to "the said Act"), *vide* its Resolution No. 161 (1), dated the 15th September 2001 declared its intention under Section 23, read with Section 38 of the said Act to prepare Draft Development Plan (2nd Revision) for the area within the limits of the Mahabaleshwar Municipal Council (hereinafter referred to as the "said Second Revised Development Plan") and Notice of such declaration was published at Page No. 2426 in the Maharashtra Government Gazette (hereinafter referred to as the "Official Gazette"), Part 1--Pune Divisional Supplement, dated 8th November 2001 ;

and whereas, the said Planning Authority, after completing all the required statutory procedures for the said Second Revised Development Plan, submitted the said Second Revised Development Plan to the Government for its sanction under Section 30 *(1)* of the Act, *vide* Letter No. 15/485/2011-2012, dated 30th March 2012 ;

and whereas, as per the Notification dated 17th January 2001(hereinafter referred to "the said Notification") issued by the Ministry of Environment and Forests, Government of India, the Mahabaleshwar-Panchgani region has been declared an Environmentally Sensitive Zone, and under the Clause No. 2 (a) (iii) of the said Notification, it was necessary for the State Government to prepare a Sub-Zonal Master Plan (Development Plan) for the Mahabaleshwar Council area with prior concurrence of the Ministry of Environment and Forests, Government of India ;

and whereas, as per the provision of Section 31 *(1)* of the said Act, the Urban Development Department of the Government *vide* Notification No. TPS-1912/160/C.R.40/12/DP Sanction/UD-13, dated 28th March 2013, has sanctioned to the part area of the said Second Revised Development Plan of the said Planning Authority subject to the condition to obtain the consent from the Ministry of Environment and Forests, Government of India ;

and whereas, the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-1915/1119/CR.311/15/EP Sanction/UD-13, dated 1st March 2016, has sanctioned the part area of the Second Revised Development Plan of Mahabaleshwar Municipal Council (EP-1 to EP-22) subject to the condition to obtain the consent from the Ministry of Environment and Forests, Government of India (hereinafter referred to as the said "Second Revised Development Plan of Excluded Part") ;

and whereas, the Ministry of Environment and Forests, Government of India, through Notification No. 2820(E), dated 16th June 2022, amended Clause 2 *(a) (iii)* of the original Notification dated 17th January 2001 accordingly (hereinafter referred to "the said Amendment") ;

and whereas, pursuant to the amendment in Notification No. 2820 (E), dated 16th June 2022, the Ministry of Environment and Forests, Government of India and after consultation with the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that it is necessary to issue a Addendum to the Notification dated 1st March 2016 in respect of confirmation to the date of implementation to the said "Second Revised Development Plan of Excluded Part" ;

Now therefore, in accordance with the provisions of Section 31 *(1)* of the said Act and in Leo of the said amendment made under Notification No. 2820(E), dated 16th June 2022, issued by the Ministry of Environment and Forests, Government of India, and by exercising the powers conferred under Section 31 *(1)* of the said Act and also with other relevant powers, the Government hereby the addendum to the Notification dated 1st March 2016 by the Government in Urban Development Department and for that purpose the following New Provision No. (d) is included at the end of the said Notification dated 1st March 2016 ;

New Provision No. (d) is to be included at the end of Notification dated 1st March 2016 :–

The Second Revised Sanctioned Development Plan (excluded part) of the Mahabaleshwar Municipal Council sanctioned by the said Notification shall come into effect after 30 days from the date of publication of the said Notification in respect of the implementation in the Maharashtra Government Gazette shall be considered as the date on which the said Second Revised Sanctioned Development Plan (excluded part) for the part area comes into effect.

This Notification is also made available on the Government of Maharashtra's website: **www.maharashtra.gov.in** under the Section Laws and Rules.

By Order and in the name of the Governor of Maharashtra,

PRANAV KARPE,
Under Secretary,
Government of Maharashtra.

संचालक, नगर रचना यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

आदेश

क्रमांक डी.टी.पी./वि.यो.बार्शी(दु.सु.)/कलम १२७*(२)*/आदेश/टीपीव्ही-१/३३०१/२०२५.— ज्याअर्थी, बार्शी नगर परिषदेची विकास योजना (दुसरी सुधारित) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिलेले आहे) चे कलम ३१ *(१)* मधील तरतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टीपीएस-१७००/५८४१/सीआर/२८/२०००/नवि-१३, दिनांक ५ फेब्रुवारी २००२ (यापुढे "उक्त अधिसूचना" असे संबोधिलेली आहे) अन्वये मंजूर केली असून, ती दिनांक १५ एप्रिल २००२ पासून अमलात आलेली आहे (यापुढे "उक्त मंजूर विकास योजना" असे संबोधिलेले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेमध्ये, मौजे बार्शी येथील गट नंबर १३९४ /२ ही जमीन ३०.०० मी. रुंद विकास योजना रस्ता यासाठी आरक्षित असून, सदर आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण, नगर परिषद, बार्शी आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षांच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमिनी संपादन केलेल्या नाहीत ;

आणि ज्याअर्थी, उक्त ३०.०० मी. रुंद विकास योजना रस्ता या आरक्षणाखालील मौजा बार्शी येथील गट नंबर १३९४/२ या जमिनींचे ५७०० चौ.मी. क्षेत्राबाबत (यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिले आहे) उक्त जमिनींच्या संबंधित जमीन मालकांनी (यापुढे "उक्त जमीनमालक" असे संबोधिले आहे) दिनांक २३ फेब्रुवारी २०१८ रोजी उक्त समुचित प्राधिकरणावर उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(१)* चे तरतुदीन्वये सूचना (यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिले आहे) बजावलेली होती ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीनमालक यांनी उक्त सूचना बजाविल्यानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे सादर केलेला होता. परंतु भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली नसल्यामुळे उक्त जमीनमालकांनी मा. उच्च न्यायालयात याचिका (क्र. ६९८६/२०२१) दाखल केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील उक्त जमिनींच्या, उक्त जमीनमालकांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ६९८६/२०२१ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २७ एप्रिल २०२२ रोजीचे आदेशान्वये (यापुढे "उक्त आदेश" असे संबोधिले आहे) उक्त जमिनींवरील आरक्षण व्यपगत ठरविले आहे ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त नमूद वस्तुस्थिती व मा. उच्च न्यायालयाचे उक्त आदेश पाहता, उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनींवरील उक्त आरक्षण व्यपगत ठरते. तथापि, आता उक्त दुसरी सुधारित मंजूर विकास योजना अमलात असल्याने, उक्त जमिनींवरील उक्त आरक्षण ३०.०० मी. रुंद विकास योजना रस्ता हे उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* चे तरतुदीन्वये व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र. टीपीएस १८१३/३२११/प्र.क्र.५०८/नवि-१३, दिनांक १ डिसेंबर २०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगरपरिषदा / नगर पंचायती / जिल्हा परिषदा यांच्या विकास योजनासंबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* अन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार उक्त अधिनियमाच्या कलम १५१ अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत ;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाचे कलम १२७ *(२)* अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर दुसरी सुधारित विकास योजनेतील उक्त जमिनींवरील, उक्त आरक्षण व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर दुसरी सुधारित विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत :-

उक्त मंजूर दुसरी सुधारित विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलाच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे :-

परिशिष्ट

अ.क्र.	नगर परिषद मौजा, तालुका व जिल्हा	उक्त मंजूर दुसरी सुधारित विकास योजनेतील आरक्षण	उक्त जमिनींचा तपशील	आरक्षणातून व्यपगत झालेले अंदाजे क्षेत्र (चौ.मी.)
१	२	३	४	५
१.	बार्शी नगर परिषद ता. बार्शी, जि. सोलापूर.	३०.०० मी. रुंद विकास योजना रस्ता.	गट नंबर १३९४/२	५७०० चौ.मी.
			एकूण	**५७०० चौ. मी.**

टीप :--

१. संबंधित जमीनमालक यांनी त्यांचे उक्त सूचनेअंतर्गत नमूद उक्त जमिनींचा भूमी अभिलेख विभागाकडील मोजणी नकाशा सादर केल्यानंतर व उक्त मंजूर विकास योजनेनुसारचे उक्त आरक्षण अशा मोजणी नकाशावर दर्शविल्यानंतर, प्रत्यक्षत: उक्त जमिनींपैकी उक्त आरक्षणाने बाधित होणाऱ्या क्षेत्रापर्यंत प्रस्तुतचे आरक्षण व्यपगत झाल्याचे समजण्यात येईल.

२. सदरच्या आदेशाच्या अनुषंगाने भाग नकाशे अधिप्रमाणित करण्यापूर्वी संबंधित जमीनमालकांनी सूचनेखालील त्यांचे जागेचा भूमी अभिलेख विभागाकडील अद्ययावत व प्रमाणित मोजणी नकाशा सादर करणे आवश्यक राहील.

३. उक्त आरक्षणातून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनींवर उक्त मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीनमालकास उपलब्ध होईल.

४. उक्त आरक्षणातून मुक्त झालेल्या जमिनींचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, नगर परिषद, बार्शी, जिल्हा सोलापूर यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

सदर आदेश संचालनालयाचे www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डॉ. प्रतिभा भदाणे,
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे, १९ जून २०२५.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

ORDER

No. D.T.P/D.P.Barshi(S.R.)/Sec.-127*(2)*/Order/TPV-I/3301/2025.— Whereas, the Development Plan of Barshi Municipal Council (Second Revision) has been sanctioned under the provisions of Section 31 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government in Urban Development Department *vide* its Notification No. TPS-1700/5841/CR/28/2000/UD-13, dated 5th February 2002 (hereinafter referred to as "the said Notification") and came into force with effect from dated 15th April 2002 (hereinafter referred to as "the said Sanctioned Development Plan") ;

and whereas, in the said Development Plan, the land bearing Gat No.1394/2 of Mouje Barshi is affected by the 30.00 mtrs. wide Develeopment Plan Road and Appropriate Authority for the acquisition and development of the said reservation is Municipal Council, Barshi ;

and whereas, the land under the said Reservation has not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Development Plan came into force ;

and whereas, the concerned land owner (hereinafter referred to as "the said Land Owner") of the land under the said Reservation 30.00 mtrs. wide Development Plan Road in respect of area 5700 sq.mtrs. Gat No. 1394/2 of Mouje Barshi (hereinafter referred to as "the said Land") had served a notice under Section 127 *(1)* of the the said Act, on the said Appropriate Authority on dated 23rd February 2018 (hereinafter referred to as "the said Notice") ;

and whereas, before service of the said Notice the land acquisition Proposal of land under reservation has been submitted to the Collector, Solapur by the said Appropriate Authority. Inspite of the submission of acquisition proposal the said land has not been acquired. Hence, the said land owner filed the Writ Petition in Hon'ble High Court, Bombay *vide* No. 6986/2021 ;

and whereas, in Writ Petition No. 6986/2021 filed by the land owner of the said land, the Hon'ble High Court of Judicature at Mumbai *vide* it's Order dated 27th April 2022 directed that the reservation on Petitioner land has been lapsed (hereinafter referred to as "the said Order") ;

and whereas, after considering the above facts and the said Order of Hon'ble High Court, Bombay, the reservation on the said land is lapsed. However, since the said Development Plan is in force, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the Order under sub-section 2 of Section 127 of the said Act, regarding the lapsing of the said Reservation 30.00 mtrs. wide Develeopment Plan Road on the said land in the said Development Plan ;

and whereas, the Government in Urban Development Department under Section 151 of the said Act, *vide* Resolution No. TPS-1813/3211/CR-508/UD-13, dated 1st December 2016, has delegated the powers exercisable by it under Section 127 *(2)* of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagarpanchayat and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune ;

Now therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this Order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said Reservation in respect of the said lands under sub-section 2 of Section 127 of the said Act and for that purpose amends the Notification of in the said Development Plan, as follows :–

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the Notification of the said Development Plan, the following new entry shall be added :–

SCHEDULE

Sr. No.	Municipal Council Mouje, Taluka and District	Reservation in the said Development Plan	Description of the said Land	Approximate Area lapsed from the Reservation (Sq.mtrs.)
1	2	3	4	5
1.	Barshi Municipal Council, Taluka Barshi, District Solapur.	30.00 mtrs. wide Development Plan Road	Gat No.1394/2	5700 sq.mtrs.
			Total	**5700 sq.mtrs.**

Note :–

1. After the concerned land owner submits the Measurement Plan of the said land mentioned under the said notice from the Land Records Department and after indicating the said Reservation as per the said Development Plan on such Measurement Plan, the reservation of the said land upto the area actually affected by the said reservation shall be deemed to have lapsed.
2. Before certifying the part plan in pursuance of the said Order, the concerned land owner shall be required to submit an updated and certified demarcation map from Land Records Department of his land under the notice.
3. The said Land so released from the said Reservation shall become available to the said Land owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Development Plan.
4. A copy of the part plan of the said Sanctioned Development Plan showing the area of the said Land which is lapsed from the said reservation, is available in the office of the Chief Officer, Barshi Municipal Council, Barshi, District Solapur during office hours on all working days for inspection to public upto one month.

This Order shall also be published on **www.dtp.maharashtra.gov.in**

DR. PRATIBHA BHADANE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune, 19th June 2025.

संचालक, नगर रचना यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

अधिसूचना

जा.क्र.प्रा.यो.,पुणे/मौ.हिंजवडी/ब्ल्यू रिज/ए.न.व.प्र./टीपीव्ही-१/३३४३/२०२५.— ज्याअर्थी, पुणे प्रदेशाची प्रादेशिक योजना (यापुढे जिचा उल्लेख "उक्त प्रादेशिक योजना" असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८९५/२२७/प्र.क्र.२६/९५/नवि-१३, दिनांक २५ नोव्हेंबर १९९७ (यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) अन्वये, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५ *(१)* (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आलेला आहे) चे तरतुदीन्वये विकास नियंत्रण नियमावलीसह मंजूर केली असून, ती दिनांक १० फेब्रुवारी १९९८ पासून अमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २० चे पोट-कलम *(४)* मधील तरतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टीपीएस-१८०४/पुणे प्रा.यो.विनिनि/नवि-१३, दिनांक १६ नोव्हेंबर २००५ आणि पूरकपत्र क्र. टीपीएस-१८०४/पुणे प्रा.यो.विनिनि/नवि-१३/पूरकपत्र, दिनांक ६ जानेवारी २००६ द्वारे उक्त प्रादेशिक योजनेच्या क्षेत्रात उक्त प्रादेशिक योजनेकरिता लागू असलेली मंजूर विकास नियंत्रण नियमावली सुधारित करून विशेष नगर वसाहतीच्या विकसनासाठीची नियमावली अंतर्भूत केली आहे व ती वेळोवेळी सुधारित करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ मधील कलम ३ चे उपकलम *(१)* च्या तरतुदीमधील अधिकाराचा वापर करून शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. पीआरडी-३३१६/प्र.क्र.५४/नवि-७, दिनांक ११ जुलै २०१६ अन्वये, उक्त प्रादेशिक योजनेतील महानगर क्षेत्रासाठी विशेष करून त्या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचित नमूद केलेल्या क्षेत्राकरिता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना केलेली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त विकास प्राधिकरण" असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाने त्यांचेकडील शासन अधिसूचना क्र. टीपीएस-१८१७/प्र.क्र.१७३/१७/नवि-१३, दिनांक १८ जानेवारी २०१८ अन्वये, उक्त विकास प्राधिकरणाची, उक्त अधिनियमाचे कलम ४० *(१)* चे तरतुदीन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून उक्त महानगर क्षेत्रासाठी नियुक्ती केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, मे. फ्लॅगशिप इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., (सध्याची परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन लि.,) यांनी (यापुढे "उक्त प्रकल्प प्रवर्तक" असा करण्यात आलेला आहे) मौजे हिंजवडी, तालुका मुळशी येथील सुमारे ५४.९४ हे. या क्षेत्राच्या व वाढीव ३.६३४१ हे. क्षेत्राच्या जमिनींवरील प्रस्तावित केलेल्या विशेष नगर वसाहत प्रकल्पास शासनाच्या नगर विकास विभागाने अनुक्रमे अधिसूचना क्र. टीपीएस-१८०६/२४०७/प्र.क्र.५१६/०६/नवि-१३, दिनांक २५ मे २००७ अन्वये व अधिसूचना क्र. टीपीएस-१८१६/प्र.क्र.५६५/१६/नवि-१३, दिनांक २९ ऑगस्ट २०१८ अन्वये अधिसूचित करून त्यानुसार एकूण ५८.५७४१ हे. क्षेत्रास स्थानीय मंजुरी देण्यात आली आहे (यापुढे "उक्त अधिसूचित विशेष नगर वसाहत प्रकल्प" असा करण्यात आला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टीपीएस-१८१८/१३४९/प्र.क्र.२२९/१८/२० *(४)*/नवि-१३, दिनांक २० नोव्हेंबर २०१८ द्वारे प्रादेशिक योजना क्षेत्रात आणि अधिसूचना क्र. टीपीएस-१८१६/प्र.क्र.३६८(भाग-१)/१५/३७ *(१कक)(ग)*/वियो/नवि-१३, दिनांक ८ मार्च २०१९ द्वारे विशेष नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्रामधील एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली अंतर्भूत केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचित विशेष नगर वसाहत प्रकल्पाचे क्षेत्र, पुणे महानगर प्रदेशांतर्गत येत असल्याने, उक्त प्राधिकरणाने दिनांक ९ जून २०२० रोजी उक्त नियमावलीमधील विनियम क्र. ६.६.१ नुसार उक्त अधिसूचित एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पाच्या ४७.६१ हे. क्षेत्राच्या सुधारित बृहत् आराखड्यास काही अटी व शर्तीसापेक्ष मान्यता दिली आहे व त्यानंतर दिनांक ४ एप्रिल २०२५ रोजी ५७.६३ हे. क्षेत्राच्या बाराव्या सुधारित बृहत् आराखड्यास मान्यता दिली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त प्रकल्प" असा केला आहे) ;

आणि ज्याअर्थी, शासनाने मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पाच्या (ITP) धोरणामध्ये बदल करण्यासाठी विनियम क्र. १४.१ मध्ये केलेला फेरबदल, उक्त अधिनियमाचे कलम ३७ *(१कक) (ग)* व २० *(४)* चे तरतुदीन्वये अधिसूचना क्र. १८२१/४५२/प्र.क्र.१०५/२०२२/(भाग-२)/नवि-१३, दिनांक ५ सप्टेंबर २०२४ नुसार मंजूर केलेला असून, या विनियम क्र. १४.१ मधील तळटीपनुसार, प्रस्तावित फेरबदलाच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी NAINA, CIDCO, MSRDC आणि PMRDA या नियोजन प्राधिकरणांच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीमधील एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पाच्या (ITP) विनियमामध्ये उक्त फेरबदलानुसारच्या तरतुदी लागू रहातील व NAINA, CIDCO, MSRDC आणि PMRDA यांच्या विकास नियंत्रण नियमावलीमधील कोणताही बदल प्रस्तावित नसलेल्या प्रचलित(ITP) क्षेत्राशी संबंधित तरतुदी आहेत तशा लागू राहणार आहेत (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त नियमावली" असा केला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचित विशेष नगर वसाहत प्रकल्पात संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी ४.२५ हे. वाढीव क्षेत्र अधिसूचना क्र. प्रा.यो.,पुणे/मौ.हिंजवडी/ए.न.व.प्र./टीपीव्ही-१/४०१२, दिनांक २ ऑगस्ट २०२२ अन्वये आणि १.७४७० हे. वाढीव क्षेत्र अधिसूचना क्र. प्रा.यो.,पुणे/मौ.हिंजवडी/ए.न.व.प्र./टीपीव्ही-१/४८८, दिनांक २ फेब्रुवारी २०२३ अन्वये आणि २.४९ हे. वाढीव क्षेत्र अधिसूचना क्र. प्रा.यो.,पुणे/मौ.हिंजवडी/ए.न.व.प्र./टीपीव्ही-१/३१२४, दिनांक १८ जून २०२४ अन्वये, तसेच १.४९५ हे. वाढीव क्षेत्र अधिसूचना क्र. प्रा.यो.,पुणे/मौ.हिंजवडी/ए.न.व.प्र./टीपीव्ही-१/५५८१, दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ आणि ०.५९१६ हे वाढीव क्षेत्र अधिसूचना क्रमांक प्रा.यो.,पुणे/मौ.हिंजवडी/ए.न.व.प्र./टीपीव्ही-१/१३३३, दिनांक १९ मार्च २०२५ अन्वये, अधिसूचित करून स्थानीय मंजुरी दिली आहे. त्यानुसार स्थानीय मंजुरी दिलेले एकूण क्षेत्र ६९.१४७७ हेक्टर इतके आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिसूचित एकात्मिक नगर वसाहत प्रकल्प" असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, आता उक्त प्रकल्प प्रवर्तक यांनी उक्त नियमावलीतील विनियम क्र. १४.१.१.४.v) मधील तरतुदीनुसार मौजे हिंजवडी, तालुका मुळशी, जिल्हा पुणे येथील सर्व्हे नंबर ११६/१/१ व १०२/१ एकूण क्षेत्र १.२७५ हे. क्षेत्र उक्त प्रकल्पाच्या क्षेत्रात नव्याने समाविष्ट करून उक्त प्रकल्प राबविण्यासाठी सुधारित स्थानीय मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव दिनांक ९ मे २०२५ रोजीच्या पत्रान्वये संचालनालयाकडे सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेच्या प्रस्तावानुसार सदरच्या वाढीव प्रकल्प क्षेत्रातील जमिनी या "शेती तथा ना-विकास" विभागामध्ये समाविष्ट आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रकल्प प्रवर्तक यांनी सादर केलेल्या कागदपत्रांनुसार उक्त प्रकल्पात अंतर्भूत करणेचे प्रस्तावित असलेल्या उक्त वाढीव जमिनींची मालकी आणि विकसन अधिकार प्रकल्प प्रवर्तक यांनी संपादित केले आहेत आणि त्या संबंधानेच्या महसूल अभिलेखाप्रमाणे प्रकल्प प्रवर्तक यांनी त्या परिणामी प्रतिज्ञापत्र सादर केले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रकल्प प्रवर्तक यांचे विनंतीवरून उक्त नियमावलीतील विनियम क्र. १४.१.१.४.v) नुसार एकात्मिकृत नगर वसाहतीसाठी स्थानीय मंजुरी दिलेल्या क्षेत्राच्या ५० टक्केपर्यंत क्षेत्र प्रकल्पामध्ये अंतर्भूत करण्यास किंवा वगळण्यास, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे मान्यता देऊ शकतात, अशी तरतूद आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रकल्प प्रवर्तक यांनी विनंती केल्यानुसार उक्त प्रकल्पामध्ये समाविष्ट करावयाचे क्षेत्र हे शासनाने स्थानीय मंजुरी दिलेल्या एकूण ६९.१४७७ हे. क्षेत्राच्या ५० टक्के मर्यादेत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रकल्पामध्ये समाविष्ट करावयाच्या जमिनींचे क्षेत्र उक्त अधिनियमाच्या कलम १८ चे पोट-कलम ३ चे तरतुदीनुसार उक्त प्रादेशिक योजना नकाशावर निर्देशित करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, रहिवास व वाणिज्य वापराव्यतिरिक्तच्या अन्य वापर विभागात अंतर्भूत उक्त वाढीव जमिनींकरिता उक्त प्रकल्प अनुज्ञेय करण्यासाठी उक्त नियमावलीतील विनियम क्र. १४.१.१.७. i) b) नुसार भराव्या लागणाऱ्या अधिमूल्यापैकी स्थानीय मंजुरीच्या टप्प्यावरील १० टक्केप्रमाणे रकमेचा भरणा रुपये ६,८२,०९०, चलन क्र. GRNMH003333271202526E, दिनांक ६ जून २०२५ / डिफेज्ड क्र. ०००२००६७२८२०२५२६, दिनांक ९ जून २०२५ अन्वये, प्रकल्प प्रवर्तकाने सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे यांच्यामार्फत शासकीय कोषागारात केला आहे ;

त्याअर्थी, आता, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे याद्वारे, सोबत जोडलेल्या अनुसूची 'अ' मध्ये सविस्तरपणे नमूद केलेले, १.२७५ हे. इतके क्षेत्र, यापूर्वी उक्त स्थानीय मंजुरी प्राप्त असलेल्या उक्त अधिसूचित एकात्मिक नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रात अंतर्भूत करण्यास उक्त नियमावली मधील विनियम क्र. १४.१.१.४.v) चे अंतर्गत खालील अटी व शर्तीस अधीन राहून मान्यता देत आहेत ;

एकात्मिकृत नगर वसाहतीसाठी अटी व शर्ती :--

१) मालकी हक्कासंबंधित :--

१) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाखालील क्षेत्रांसह उक्त वाढीव जमिनींच्या मालकी संबंधीच्या सत्यतेची सर्व जबाबदारी उक्त प्रकल्प प्रवर्तक यांचेवर राहील, तसेच उक्त जमिनींचे सर्व मालकी / विकसन हक्क उक्त प्रकल्प प्रवर्तकांकडे असणे आवश्यक राहील. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे इरादा पत्राकरिता अर्ज करताना नोंदणीकृत सामंजस्य कराराची प्रत, संयुक्त उपक्रमाची नोंदणीकृत कागदपत्रे, मूळ मोजणी नकाशे, मालकी हक्क, विकास हक्क सिद्ध करणारी कागदपत्रे इत्यादी कागदपत्रांच्या मूळ प्रमाणित प्रती सादर करणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

२) उपअधीक्षक, भूमी अभिलेख यांच्याकडून देण्यात आलेले अधिकृत मोजणी नकाशे उपलब्ध झाल्यानंतर प्रस्तावांतर्गत समाविष्ट करावयाच्या भागश: जमिनी उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पात अंतर्भूत करणे आवश्यक आहेत. जर उक्त वाढीव जमिनी उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पांतर्गतच्या अशा जमिनींशी सलग राहत नसतील तर अशा जमिनींचे क्षेत्र उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रातून आपोआप वगळल्या जातील व अशा क्षेत्रात उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प राबविता येणार नाही.

३) इरादापत्र देण्यापूर्वी उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये अंतर्भूत जमिनींपैकी भूधारणा पद्धती भोगवटा वर्ग-२, सरकार व नवीन शर्तीच्या जमिनीसंदर्भाने व इतर हक्कात नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमान्वयेचे घोषित अतिरिक्त क्षेत्र, नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमाचे कलम २० योजनेचे क्षेत्र इत्यादीबाबत आवश्यक ती कार्यवाही जिल्हाधिकारी, पुणे यांनी करणेची आहे.

४) इरादापत्र देण्यापूर्वी उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पांतर्भूत जमिनींच्या ७/१२ उताऱ्यांवरील इतर हक्क स्तंभात नमूद बँकेचे भार व इतर नावेसंदर्भात जिल्हाधिकारी, पुणे यांनी पडताळणी करावी व नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

५) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रात समाविष्ट करावयाच्या उक्त वाढीव जमिनींच्या ७/१२ उताऱ्यानुसार सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर मोजणी नकाशानुसार जुळत असल्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांनी इरादापत्र (Letter of Intent) देणेपूर्वी खात्री / पडताळणी करणे आवश्यक राहील.

६) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रात समाविष्ट जमिनींच्या मालकी हक्कासंदर्भात कोणतेही दस्तऐवज खोटे असल्याचे भविष्यात उघडकीस आल्यास किंवा उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाबाबत भविष्यात न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास त्याबाबत स्वत:च्या जबाबदारी व खर्चाने उपाययोजना करण्याची सर्वस्वी जबाबदारी उक्त प्रकल्प प्रवर्तकांची राहील. अशा परिस्थितीत अशा जमिनीसाठीं देण्यात आलेली स्थानीय मंजुरी आपोआप रद्द समजण्यात येईल.

(II) पर्यावरण व इतर अनुषंगिक बाबी :--

१) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पक्षेत्रात समाविष्ट जमिनींमध्ये कोणतेही विकास / बांधकाम हाती घेणेपूर्वी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय आणि योग्य त्या प्राधिकरणाची पर्यावरणीय मंजुरी (Environmental Clearance) घेणे आवश्यक राहील, तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाकडील पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन अधिनियम, १९८६ अंतर्गत वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचनेमधील अटीं व शर्तींचे पालन करणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

२) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामधील घनकचऱ्याची आणि सांडपाण्याची विल्हेवाट सुरक्षितपणे लावण्यासाठी योग्य ती व्यवस्था उक्त प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांच्या स्वत:च्या जबाबदारीवर व त्यांच्या स्वखर्चाने आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठरविलेल्या निकषाप्रमाणे व तसेच त्यासंबंधीच्या अधिनियमातील तरतुदी व नियमानुसार करणे आवश्यक राहील.

३) प्रकल्पात समाविष्ट करावयाच्या सर्व्हे नंबर ११६/१/१ व १०२/१ या जमिनी लाभ क्षेत्रात येत असल्याचे नमूद करून विकासकामे करण्यापूर्वी शासनाच्या सक्षम स्तरावरून पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असल्याचे जलसंपदा विभागाने प्रकल्प प्रर्वतक यांना पत्र क्रमांक ४६५१, दिनांक २९ ऑगस्ट २०२२ अन्वये कळविले आहे. त्यामुळे विषयांकित जमिनींवर विकासकामे करण्यापूर्वी शासनाच्या सक्षम स्तरावरून पूर्वपरवानगी घेणे प्रकल्प प्रर्वतक यांचेवर बंधनकारक राहील.

राज्य शासनाचे जलसंपदा विभाग व अन्य संबधित विभाग वेळोवेळी विहित करतील, त्या अटी व शर्तींचे पालन करणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील. उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रातून विद्यमान पाण्याचे स्त्रोत / नाल्याचा प्रवाह इ. असल्यास तो बंद करता येणार नाही.

प्रकल्पात समाविष्ट करावयाच्या जमिनींबाबत आवश्यकतेनुसार पुनर्स्थापना खर्चाबाबत जलसंपदा विभागाचे प्रमाणपत्र / ना-हरकत प्रमाणपत्र, प्रकल्पास इरादापत्र (Letter of Intent) मिळणेपूर्वी जिल्हाधिकारी यांनी घेणे आवश्यक राहील.

४) सहायक संचालक, पुरातत्व विभाग, पुणे यांनी दिलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रातील अटी व शर्ती प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहतील.

५) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या विकासाकामी उक्त नियमावलीमधील विनियम क्र. १४.१.१.१० v) a) नुसार पाणीपुरवठा उक्त प्रकल्प प्रर्वतकांनी त्यांच्या स्वखर्चाने व जबाबदारीने पुरविणे आवश्यक राहील. जलसंपदा विभागाकडून यानुषंगाने वेळोवेळी दिलेल्या अटी व शर्तींचे पालन करणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

६) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या विकासाकामी उक्त नियमावलीतील विनियम क्र. १४.१.१.१० v) c) नुसार वीजपुरवठा उक्त प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांच्या स्वखर्चाने व जबाबदारीवर पुरविणे आवश्यक राहील, तसेच उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प विकासाकरिताच्या उक्त नियमावलीतील विनियम क्र. १४.१.१.६ v) नुसार उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाचा बृहत् आराखडा मंजूर करणेपूर्वी उक्त प्राधिकरणाने उक्त प्रकल्प प्रवर्तकांकडून वीजपुरवठा करणाऱ्या कंपनीकडून उक्त प्रकल्पाच्या संपूर्ण क्षेत्राकरिता आवश्यक परवानगी आणि तसेच वीजपुरवठ्याची दृढवचनबद्धता (Firm Commitment of Power Supply for the entire integrated township from the power supply company) प्राप्त करणे आवश्यक राहील.

७) उक्त प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडील जमिनी या प्रस्तावात समाविष्ट नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(III) विकासासंबंधाने :--

४) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्राने वेढल्या गेलेल्या अन्य खाजगी व्यक्तींच्या जमिनींसाठी उक्त नियमावलीनुसार आवश्यक; परंतु किमान ९.० मी. रुंदीचा पोहोच मार्ग विना मोबदला उपलब्ध करून देणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

२) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्राच्या जमिनींमधून जाणाऱ्या विद्यमान सार्वजनिक रस्त्यांच्या वहिवाटीचे हक्क अबाधित ठेवणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

३) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रांमधील ओहोळ / नाल्यांवर संबंधित विभागाच्या परवानगीने सी.डी. वर्क करणे आणि उक्त प्रकल्प क्षेत्रामध्ये अंतर्भूत नदी, नाले, कॅनॉल, तलाव आणि इतर जलस्रोतापासून उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प विकासाकरिताच्या उक्त नियमावलीनुसार आवश्यक ते अंतर ठेवणे उक्त प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

४) विकास योजना नकाशावर विशेषत: दर्शविले असले अथवा नसले तरीही अधिकृत कंटूर नकाशानुसार १:५ किंवा त्यापेक्षा जास्त तीव्र उताराचे क्षेत्रावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम अनुज्ञेय नाही, तसेच या क्षेत्रामध्ये जमिनीची खोदाई / सपाटीकरण / भराव, इ. विकास कार्य अनुज्ञेय नाही.

५) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये सामाविष्ट होणाऱ्या लोकसंख्येसाठी नियमानुसार आवश्यक असणारी मंजूर विकास योजनेनुसार सार्वजनिक प्रयोजनासाठीची आरक्षणे व रस्ते विकसित करून सर्वसामान्य जनतेसाठी उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील आणि तसेच मूलभूत सुविधा यासाठी उक्त प्रकल्पाच्या क्षेत्रामध्ये सुयोग्य स्थानी नियोजन आणि निश्चित करून ती उक्त प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांच्या स्वखर्चाने विकसित करणे बंधनकारक राहील.

६) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये प्रत्येक इमारतीकरिता Rain Water Harvesting यंत्रणा उभारणी व कार्यान्वित करणे उक्त प्रकल्प प्रवर्तक यांचेवर राहील.

७) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामधील प्रत्येक इमारतीमधील वापरण्यात येणाऱ्या पाण्यासंदर्भात Waste Water Recycling ची प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर होईल, याबाबतची सुविधा यंत्रणा उपलब्ध करून देण्याचे उक्त प्रकल्प प्रवर्तक यांचेवर बंधनकारक राहील.

८) उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामध्ये सौर उर्जा वापर यंत्रणा उभारणी आणि कार्यान्वयन करणे उक्त प्रकल्प प्रवर्तक यांचेवर बंधनकारक राहील.

(IV) इतर अटी व शर्ती :--

१. या अधिसूचनेत नमूद अटी / शर्तींसह शासनाने उक्त एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या मूळ स्थानीय मंजुरीच्यावेळी दिनांक २५ मे २००७, दिनांक २९ ऑगस्ट २०१८ संचालनालयाकडील दिनांक २ ऑगस्ट २०२२, दिनांक २ फेब्रुवारी २०२३, दिनांक १८ जून २०२४ व दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ व १९ मार्च २०२५ रोजीच्या अधिसूचनेत नमूद केलेल्या सर्व अटी / शर्ती उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्रासाठी लागू राहतील.

२. उक्त प्रकल्प प्रवर्तकांकडून अटीं / शर्तींचा भंग झाल्यास या अधिसूचनेद्वारे प्रदान करण्यात आलेली स्थानीय मंजुरी रद्द करण्याचा अधिकार शासनाकडे राखून ठेवण्यात येत आहे.

३. सदर एकात्मिकृत नगर वसाहतीसाठी शासनाने दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मंजूर केल्यानुसार एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या फेरबदलासह लागू राहील.

४. उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्षेत्राकरिता उक्त नियमावलीमधील विनियम क्र. १४.१.१.७ v) Share of Local / Planning Authority नुसारच्या तरतुदी लागू राहतील.

५. सदर अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अमलात येईल.

६. प्रस्तावाखालील स्थानीय मंजुरी प्राप्त उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पात समाविष्ट करावयाच्या उक्त वाढीव जमिनींचा तपशील सोबतच्या अनुसूची 'अ' मध्ये दर्शविण्यात आला आहे, तसेच वाढीव जमिनींसह उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाची हद्द दर्शविणारा नकाशा अनुसूची 'ब' अधिसूचनेसोबत जोडला आहे.

७. पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या प्रारूप / अंतिम विकास योजनेमधील विकास योजना रस्ते, आरक्षणे व प्रस्ताव सदर एकात्मिकृत नगर वसाहतीमध्ये कायम ठेवून त्यांचा विकास करून, त्या सुविधा सर्वसामान्य जनतेसाठी उपलब्ध करून देणे प्रकल्प प्रवर्तकांवर बंधनकारक राहील.

उक्त अधिसूचित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पात अंतर्भूत करावयाच्या उक्त वाढीव जमिनींचा तपशील आणि हद्दी दर्शविणारा नकाशा सदर अधिसूचनेसह नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खाली नमूद कार्यालयामध्ये एक महिन्याच्या कालावधीकरिता उपलब्ध राहील.

१. महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

२. जिल्हाधिकारी, पुणे.

३. सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.

४. उपसंचालक, नगर रचना, नागरी संशोधन घटक, मुख्य कार्यालय, पुणे.

५. सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा.

अनुसूची - अ

परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन्स लि., यांच्या मौजे हिंजवडी, तालुका मुळशी, जिल्हा पुणे येथील मंजूर एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पामध्ये समाविष्ट करावयाच्या क्षेत्राचा तपशील

अ.क्र.	मौजे	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	प्रकल्पात नव्याने समाविष्ट करून अधिसूचित करावयाचे क्षेत्र (हे.)
१	२	३	४	५
		अधिसूचित केलेल्या क्षेत्रामध्ये वाढ झालेल्या क्षेत्राचा तपशील :--		
१	हिंजवडी	११६	१/१	०.५८
२	हिंजवडी	१०२	१	०.६९५
			एकूण	**१.२७५ हे.**
दिनांक १९ मार्च २०२५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अधिसूचित केलेले क्षेत्र.				६९.१४७७ हे.
या अधिसूचनेद्वारे एकात्मिक नगर वसाहतीचे एकूण सुधारित अधिसूचित केलेले क्षेत्र.				७०.४२२७ हे.

सदरहू अधिसूचना नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.

डॉ. प्रतिभा भदाणे,
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे, २० जून २०२५.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

NOTIFICATION

No. R.P.,Pune/Village Hinjawadi/Blue Ridge/ITP/TPV-1/3343/2025.— Whereas, the Government in Urban Development Department, *vide* it's Notification No. TPS-1895/227/C.R.26/95/UD-13, dated 25th November 1997 has sanctioned the Regional Plan for the Pune Region (hereinafter referred to as "the said Regional Plan") with Development Control Regulation under the provisions of Section 15 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") which has come into force with effect from 10th February 1998 ;

and whereas, the Government of Maharashtra in Urban Development Department, *vide* Notification No. TPS/1804/Pune RP. D.C.R./UD-13, dated 16th November 2005 and Addendum No. TPS-1804/Pune RP. D.C.R./UD-13/Addendum, dated 6th January 2006 has incorporated the regulations for Development of Special Townships by amending the sanctioned Development Control Regulations for the said Regional Plan, under the provisions of sub-section *(4)* of Section 20 of the said Act, and it has further amended from time to time ;

and whereas, in exercise of the powers conferred by the provisions of sub-section *(1)* of Section 3 of the Maharashtra Metropolitan Development Authority Act, 2016 the Government *vide* Notification of Urban Development Department No. PRD-3316/CR-54/UD-7, dated 11th July 2016 has established Metropolitan Region Development Authority to be called "the Pune Metropolitan Region Development Authority" (hereinafter referred to as "the said Development Authority") for the Metropolitan Area of Regional Plan more specifically described in the Schedule appended thereto ;

and whereas, the Government in Urban Development Department *vide* it's Government Notification No. TPS-1817/CR-173/17/UD-13, dated 18th January 2018, appointed the said Development Authority as a "Special Planning Authority" under the provisions of Section 40 *(1)* of the said Act ;

and whereas, the Government in Urban Development Department has accorded Location Clearance for the Special Township Project proposed by Flagship Infrastructure Pvt. Ltd., (Now Paranjape Scheme Construction Ltd.,) (hereinafter referred to as "the said Project Proponent") in Village Hinjawadi, Taluka Mulshi, District Pune on lands admeasuring on area of 54.94 Ha., and 3.6341 Ha. additional area approximately *vide* Government Notification No. TPS-1806/2407/C.R.516/06/UD-13, dated 25th May 2007 and Notification No. TPS-1816/C.R.565/16/UD-13, dated 29th August 2018 respectively *i.e.* total area 58.5741 Ha. (hereinafter referred to as the "said Notified Special Township Project") ;

and whereas, the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-1818/1349/CR-229/18/20(4)/UD-13, dated 20th November 2018 for regional plan area and Notification No. TPS-1816/CR.368/16/part-1/DP-ITP/UD-13, dated 8th March 2019 sanctioned Development Control Regulations for the Special Planning Authority area in Order to incorporate the regulations for Development of Integrated Townships Project ;

and whereas, the said notified Special Township Project area came within Pune Metropolitan Region and the said Development Authority has sanctioned revised master plan of the said notified Township Project on dated 9th June 2020 for 47.61 Ha. area with certain condition as per Regulation No. 6.6.1 of the above Regulations and thereafter, Twelfth Revised master plan sanctioned on dated 4th April 2025 for 57.63 Ha. area (hereinafter referred to as the "said Project") ;

and whereas, under the provisions of Sections 37*(1AA)(c)* and 20 *(4)* of the said Act, the Government in Urban Development Department *vide* it's Notification No. TPS-1821/452/CR-105/2022/(Part-2)/UD-13, dated 5th September 2024 sanctioned the modification, to make certain changes in the Regulation No. 14.1 for the Integrated Township Project of the sanctioned Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR). As per the footnote of the above modified Regulation No. 14.1, for the effective implementation of these proposed modifications will be applicable to the prevailing ITP policy of the respective DCR of NAINA, CIDCO, MSRDC and PMRDA, the prevailing provisions of ITP policy of respective DCR of NAINA, CIDCO, MSRDC and PMRDA will continue wherein no modifications are proposed (hereinafter referred to as "the said Regulations") ;

and whereas, in the said Notified Special Township Project the Director of Town Planning, Maharashtra State, Pune has accorded Locational Clearance for additional land admeasuring 4.25 Ha. *vide* Notification No. R.P.,Pune/village Hinjawadi/ITP/TPV-1/4012, dated 2nd August 2022 and 1.7470 Ha. *vide* Notification No. R.P.,Pune/Village Hinjawadi/ ITP/TPV-1/488, dated 2nd February 2023, and 2.49 Ha. *vide* Notification No. R.P.,Pune/Village Hinjawadi/ITP/TPV-1/3124, dated 18th June 2024 and additional land admeasuring 1.495 Ha. *vide* Notification No. R.P.,Pune/Village Hinjawadi/ITP/TPV-1/5581, dated 14th October 2024 and 0.5916 Ha. *vide* Notification No. R.P.,Pune/Village Hinjawadi/ITP/TPV-1/1333, dated 19th March 2025. Accordingly, total area having Locational Clearance is 69.1477 Ha. (hereinafter referred to as the "said Notified Integrated Township Project") ;

and whereas, the said project proponent now *vide* it's letter dated 9th May 2025 submitted a proposal as per the provisions of Regulation No. 14.1.1.4 v) of the said Regulations to the Directorate for the grant of revised Locational Permission by incorporating new additional land admeasuring area about 1.275 Ha. from S. No. 116/1/1 and S. No. 102/1 of village Hinjawadi, Taluka Mulshi, District Pune in the area of the said Project ;

and whereas, as per the said Regional Plan, the said additional lands are included in "Agriculture and No Development Zone" ;

and whereas, as per the documents submitted by the said Project Proponent, the Ownership and Development Rights of the said additional lands proposed to be incorporated in the said Project are to be acquired by the said Project Proponent and the said Project Proponent has also submitted an Affidavits to that effect as per Revenue record ;

and whereas, as per the Regulation No. 14.1.1.4 v) of the said Regulation, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune as per the request of said Project Proponent, may grant to add or delete any area, not exceeding 50 per cent of the total area under Locational Clearance ;

and whereas, as per the request of the said Project Proponent, the area of the said additional lands to be added is less than 50 per cent of the 69.1477 Ha. area of the said Project, for which Government has given locational clearance.

and whereas, it is accordingly expedient to designate the area of the lands to be incorporated and deleted on the said Regional Plan under the provisions of sub-section *(3)* of Section 18 of the said Act as the additional project area for the said Project ;

and whereas, the said Project Proponent, *vide* Challan No. GRN MH0003333271202526E, dated 6th June 2025 / Defacement No. 0002006728202526, dated 9th June 2025 has deposited an amount of Rs. 6,82,090 through the Assistant Director of Town Planning, Pune Branch, Pune which is at the rate of 10 per cent of the total premium charges at the stage of Locational Permission as per the Regulation No. 14.1.1.7 i) b) of the said regulation for said Project for the said additional lands falling in zones, other than residential and commercial ;

Now therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune under the regulation No. 14.1.1.4 v) of the said Regulation hereby grants permission to add the area 1.275 Ha. more specifically described in Schedule - A appended hereto, in the area of said Notified Integrated Township Project for which Locational permission has already been granted, subject to the following terms and conditions ;

"Terms and Conditions of the Integrated Township Project" :–

(I) Conditions of Ownership:–

1) It shall be the responsibility of the said Project Proponent to procure the proof of Ownership / Development Rights of said additional lands along with the area under the said Notified Integrated Township Project. Also while applying for Letter of Intent, it is obligatory on the said Project Proponent to submit to the Collector, Pune, the extracts of original certified documents of the registered Memorandum of Understanding, registered documents of joint venture, original measurement plans, documents proving the ownership rights, development rights etc.

2) Part area of lands shall be included in the said Notified Integrated Township Project after obtaining measurement plan issued by the Deputy Superintendent of Land Records. If such lands are not remain continuous with the lands under the said Notified Integrated Township Project, then area of land stand automatically deleted from the said Notified Integrated Township Project area and the said Notified Integrated Township Project shall not be implemented on such lands.

3) Collector, Pune should take appropriate action regarding land holding titles like "भोगवटा वर्ग-२", "सरकार" " New Tenure" lands and Surplus lands declared under Urban Land Ceiling Act, area of schemes under Section 20 of the Urban Land Ceiling Act etc. which are included in the said Notified Integrated Township Project before issuing the letter of intent.

4) Collector, Pune shall verify and take appropriate action in respect of lands which are included in the said Notified Integrated Township Project having entries regarding bank encumbrances and names in the Other Right's column of 7/12 extract, before issuing the letter of intent.

5) Before issuing Letter of Intent, the said Authority confirm / verify that, the Survey Number and Hissa Number of 7/12 extracts of the said additional lands to be included in the said Notified Integrated Township Project area should match with record of Measurement Plan.

6) If any document of ownership of lands included in the area of the said Notified Integrated Township Project is found false in future or if any judicial proceedings arise regarding the said Notified Integrated Township Project in future, then it shall be the sole responsibility of the said Project Proponent to deal with those proceedings at his own risk and cost. In such case Locational Clearance shall be deemed to be cancelled automatically for that lands.

(II) Conditions Regarding Environment and Others :–

1) The said Project Proponent shall obtain the Environmental Clearance from the Ministry of Environment, Forest and climatic change (MoEF and CC) and from the Appropriate Competent Authority before obtaining the Building Permission within the lands to be incorporated in the area of the said Notified Integrated Township Project. Also the terms and conditions of the Notifications issued by the Ministry of Environment, Forest and Climate Change for the Environment Impact Assessment Act, 1986 from time to time shall be binding on the said Project Proponent.

2) The said Project Proponent shall be responsible for making provision for safe disposal of Solid Waste and effluents within the said Notified Integrated Township Project at his own risk and their own cost, as per the criteria and norms decided by the Maharashtra Pollution Control Board and also subject to the provisions and rules under the relevant Act, in this regard.

3) The Irrigation Department has informed the Project Proponent *vide* Letter No. 4651, dated 29th August 2022 that the lands bearing S. Nos. 116/1/1 and 102/1 falls within the command area and it is mandatory to obtain prior permission from the competent level of the Government, before carrying out development works. Therefore, it will be mandatory for the Project Proponent to obtain prior permission from the competent level of the Government, before carrying out development works on the subject land.

   The terms and conditions imposed by the Irrigation Department and other concerned department of the State Government from time to time shall be binding on the said Project Proponent. The existing nallas / water courses, etc., in the area of the said Notified Integrated Township Project shall not be closed.

   In respect of lands to be included in the said project, a certificate / No-objection certificate of Irrigation Department about cast of restoration as required should be obtained by the Collector before getting the Letter of Intent for the Project.

4) The terms and conditions mentioned in the No-objection certificate issued by the Assistant Director, Department of Archaeology shall be binding on the said Project Proponent.

5) It shall be binding on the said Project Proponent to provide water supply for the development of the said Notified Integrated Township Project as per Regulation No. 14.1.10 v) a) of the said Regulations at their own cost and responsibility. The conditions prescribed by Irrigation Department in these regards, from time to time are binding on the said Project Proponent.

6) It shall be binding on the said Project Proponent to provide electricity supply for the development of the said Notified Integrated Township Project as per the Regulation No. 14.1.10 v) c) of the said Regulation at their own cost and responsibility. Also the said Authority, shall obtain from the Project Proponent, necessary permissions and also the firm commitment of electricity supply for the entire area of the said Notified Integrated Township Project from the concerned power supply company before the approval of the Master Plan as per Regulation No. 14.1.1.6 v) of the said Regulation.

7) The said project proponent shall submit certificate regarding the lands of Maharashtra Industrial Development Corporation are not included in Integrated Township.

(III) Regarding Development :–

1) The said Project Proponent shall provide access road of required width as per said Regulation but minimum 9.0 mtrs. free of cost to the lands owned by other private persons, which are surrounded by the area under the said Notified Integrated Township Project.

2) It is binding on the said Project Proponent to protect the easement rights of the existing public roads passing through the area of the said Notified Integrated Township Project.

3) It shall be binding on said Project Proponent to construct CD work on Nalla included in the area of the said Notified Integrated Township Project with the permission of concern department and to keep distance from River, Nallas, Canal, Lake and other Water bodies within the area of the said Notified Integrated Township Project required as per the said Regulation for Development of Integrated Township Project.

4) No construction of any type shall be allowed on the lands having slope equal to or more than 1:5 in the said project, whether such lands are specifically marked as such on the Development Plan or not. Also No development activity shall be permissible and no development involving cutting / levelling / filling etc. Shall be allowed on such lands.

5) The said Project Proponent shall have to plan and earmark the lands at suitable location within the area of the said Notified Integrated Township Project for public purpose reservations and also for basic infrastructure required for the population to be accommodated within the said Project, as per the said Regulation and shall plan and develop the same at his own cost.

6) It shall be binding on the said Project Proponent to provide the System of Rain Water Harvesting in each building of the said Notified Integrated Township Project.

7) It shall be binding on the said Project Proponent to provide the System of Waste-Water Recycling in each building of the said Notified Integrated Township Project for reuse of the used water.

8) It shall be binding on the said Project Proponent to provide and operate Solar Energy System within the said Notified Integrated Township Project.

(IV) Other Terms and Conditions :–

1) The terms and conditions mentioned with reference to the Locational Clearance, amalgamation and the said additional area *vide* Notifications, dated 25th May 2007, dated 29th August 2018, issued by the Government in Urban Development Department and Notification dated 2nd August 2022, dated 2nd February 2023, dated 18th June 2024 and dated 14th October 2024 and dated 19th March 2025 issued by Directorate of Town Planning shall be applicable for the said Notified Integrated Township Project.

2) In case of breach of any of the terms and conditions by the said Project Proponent the powers / rights of cancellation of the Locational Clearance granted *vide* this Notification are reserved with Government.

3) The Unified Development Control and Promotional Regulations, sanctioned by the Government *vide* Notification dated 5th September 2024 for the said Integrated Township shall continue to be applicable subject to modification thereof from time to time.

4) The provisions mentioned in Regulation No. 14.1.1.7 v) of the said Regulation regarding the share of Local / Planning Authority shall be applicable for the said Notified Integrated Township Project.

5) This Notification shall come into force on the date of its publication in the Maharashtra Government Gazette.

6) The details of the said additional lands incorporated within the said Notified Integrated Township Project are given in "Schedule - A" appended hereto. Also the plan showing the boundaries of the said Notified Integrated Township Project including the said additional lands is given in "Schedule-B" appended hereto.

7) It is binding on the said Project Proponent to provide and develop the Development Plan Roads, reservations and proposals provided in the Draft / Final Development Plan of PMRDA and these shall be made available to the common public.

The details of the said additional lands incorporated within the said Notified Integrated Township Project and the plan showing the boundaries along with this Notification shall be made available for the inspection of the general public during office hours on all working days at the following offices :–

1. The Metropolitan Commissioner, Pune Metropolitan Region Development Authority, Pune.
2. The Collector, Pune.
3. The Joint Director of Town Planning, Pune Division, Pune.
4. The Deputy Director of Town Planning, Urban Research Cell, Pune.
5. The Assistant Director of Town Planning, Pune Branch.

Schedule - A

Details of Lands included in Integrated Township Project of Paranjape Scheme Construction Ltd., at Hinjawadi, Taluka Mulshi, District Pune

Sr. No.	Mouje	Survey No.	Hissa No.	Details of land area to be included in earlier notified area (Ha.)
1	2	3	4	5
1	Hinjawadi	116	1/1	0.58
2	Hinjawadi	102	1	0.695
			Total	**1.275 Ha.**
	Area Notified By Notification dated 19th March 2025.			69.1477 Ha.
	Total Revised Notified Area of Township.			70.4227 Ha.

This Notification shall also be published on the website of Directorate of Town Planning and Valuation **www.dtp.maharashtra.gov.in**

DR. PRATIBHA BHADANE,

Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune, 20th June 2025.

सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

अधिसूचना

क्रमांक न.र.यो.सासवड क्र.१/मुदतवाढ/कलम ६१*(३)*/सहसंपुवि/८५७/२०२५.— ज्याअर्थी, सासवड नगरपरिषदेने (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त नियोजन प्राधिकरण" असा केला आहे.) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केला आहे.) कलम ६० *(१)* अन्वये सासवड नगर रचना योजना क्र. १ यातील समाविष्ट क्षेत्राची नगर रचना योजना (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त नगर रचना योजना" असा केला आहे.) तयार करणेचा इरादा, ठराव क्र. २९९, दिनांक २८ जून २०२४ अन्वये पारित केला आहे व उक्त ठरावाचे प्रसिद्धीकरण महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, जुलै १८ - २४, २०२४, पृष्ठे २४ - २५ वर केले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमातील कलम ६१ *(१)* मधील तरतुदीन्वये उक्त नगर रचना योजना इरादा जाहीर केलेल्या दिनांकापासून नऊ महिन्यांच्या कालावधीत किंवा उक्त अधिनियमाच्या कलम ६१ *(३)* मधील तरतुदीन्वये वाढविलेल्या कालावधीत तयार करून प्रसिद्ध करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील कलम १४८ क अन्वये लोकसभा / विधानसभा सार्वत्रिक निवडणुकींचा आचार संहितेचा कालावधी वगळणेच्या तरतुदीनुसार, उक्त नगर रचना योजना तयार करणेचा विहित कालावधीत लागू असलेल्या विधानसभा निवडणूका २०२४ च्या आचारसंहितेचा कालावधी वगळल्यानंतर उक्त प्रारूप नगर रचना योजना प्रसिद्ध करणेचा अंतिम दिनांक ९ मे २०२५ हा आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने त्यांचे पत्र क्रमांक १९०३, दिनांक १९ जून २०२५ अन्वये सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांना उक्त अधिनियमाच्या कलम ६१ *(३)* नुसार उक्त नगर रचना योजना तयार करून प्रसिद्ध करणेसाठी तीन महिन्यांची म्हणजेच दिनांक ९ मे २०२५ ते दिनांक ९ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदतवाढ अपेक्षिली आहे ;

आणि ज्याअर्थी, व्यापक जनहितार्थ, उक्त प्रारूप नगर रचना योजना तयार करून प्रसिद्ध करणेसाठी विहित कालावधीमध्ये वाढ करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम १५१ अन्वये शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस-१८१३/३२११/प्र.क्र.५०८/नवि-१३, दिनांक १ डिसेंबर २०१६ नुसार प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून, उक्त अधिनियमाच्या कलम ६१ *(३)* अन्वये, उक्त नगर रचना योजना तयार करून प्रसिद्ध करणेसाठी दिनांक ९ मे २०२५ पासून पुढे तीन महिन्यांची म्हणजेच दिनांक ९ ऑगस्ट २०२५ पर्यंत त्यादिवसांसह मुदतवाढ देणेत येत आहे.

रा. म. पवार,
सहसंचालक,
नगर रचना, पुणे विभाग, पुणे.

पुणे, २० जून २०२५.

BY JOINT DIRECTOR OF TOWN PLANNING, PUNE DIVISION

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

NOTIFICATION

No. T.P.S.Saswad No.1/Extn./Section 61*(3)*/857/2025.— Whereas, the Saswad Municipal Council (hereinafter referred to as the “said Planning Authority”) in exercise of the powers vested in it under sub-section *(1)* of Section 60 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as the “said Act”) by it’s Resolution No. 299, dated 28th June 2024, declared its intention to prepare the Draft Town Planning Scheme, Saswad No. 1, (hereinafter referred to as “the said Draft Scheme”) for the area comprised in that scheme and published the declaration so made in accordance with the provisions of sub-section *(2)* of Section 60 of the said Act in the Maharashtra Government Gazette, Part 1-Pune Divisional Supplement, July 18-24, 2024 at Pages 24-25 ;

and whereas, in accordance with the provisions of sub-section *(1)* of Section 61 of the said Act, the said Planning Authority has to make and publish the said draft scheme not later than nine months from the date of declaration of intention to prepare the said draft scheme *i.e.* before dated 28th March

2025 or within such further period as may be extended by the Government, under the provisions of sub-section *(3)* of Section 61 of the said Act ;

and whereas, in accordance with the provisions of Section 148-A of the said Act, from the stipulated time limit, time due to enforcement of code of conduct of the General Election of Legislative Assembly of Maharashtra, by the Election Commission of India shall be excluded and after excluding the time of enforcement of code of conduct of General Election of Legislative Assembly of Maharashtra 2024 the said draft scheme has to be prepared and published before dated 9th May 2025 ;

and whereas, the said Planning Authority by it's Letter No. 1903, dated 19th June 2025 has requested the Joint Director of Town Planning, Pune Division, Pune to extend the period for making and publishing the said draft scheme, under the provisions of sub-section *(3)* of Section 61 of the said Act, by a further period of three months from dated 9th May 2025 to 9th August 2025 ;

and whereas, it is expedient to extend the period for preparation and publication of the said draft scheme by a period of three months from dated 9th May 2025 to 9th August 2025 in larger public interest.

Now, therefore, in exercise of the powers delegated to undersigned under the Government Notification in Urban Development Department, No. TPS-1813/3211/C.R.508/17/UD-13, dated 1st December 2016 and all other powers enabling it in that behalf, the Joint Director of Town Planning, Pune Division, Pune is hereby pleased to extend, under sub-section *(3)* of Section 61 of the said Act, the period for making and publishing the said draft scheme by a further period of three months from dated 9th May 2025, upto and inclusive of dated 9th August 2025.

R. M. PAWAR,
Joint Director of Town Planning,
Pune Division, Pune.

Pune, 20th June 2025.

सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती तथा सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

अधिसूचना

क्रमांक प्रा.यो.कोल्हापूर/मौ.टोप/ता.हातकणंगले/२४ मी.रुंद प्रा.यो.रस्ता/कलम २० *(४)*/सहसंपुवि/८८२/२०२५.— ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्यास "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे), मधील तरतुदीनुसार कोल्हापूर जिल्ह्याची प्रादेशिक योजना (यापुढे ज्यास "उक्त प्रादेशिक योजना" असे संबोधले आहे) शासनाने दिनांक ४ जानेवारी २०१८ रोजी मंजूर केली असून, ती दिनांक १ एप्रिल २०१८ पासून अमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेच्या अनुषंगाने नियोजन समितीने सूचना / हरकतदारांना योग्यरितीने सुनावणी न दिल्याने हरकती / सूचना घेतलेल्या बहुतांश नागरिकांच्या हरकतीचे निराकारण योग्यरितीने झालेले नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते, तसेच ज्या सूचना / हरकत धारकांनी सूचना / हरकती घेतलेल्या आहेत व त्यांचे योग्य ते निराकारण झालेले नाही, अशा सर्व नागरिकांना त्यांची बाजू मांडण्यासाठी एक संधी देणे आवश्यक झाले होते. उक्त बाब शासनाच्या निदर्शनास आल्याने उक्त प्रादेशिक योजनेबाबतच्या प्राप्त सूचना / हरकती / तक्रारींच्या अनुषंगाने उक्त प्रादेशिक योजनेमध्ये उक्त अधिनियमाचे कलम २० अन्वये फेरबदलाची कार्यवाही सुचविणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी शासनाकडून दिनांक ३ एप्रिल २०१८ रोजीच्या निर्णयाद्वारे त्रिसदस्यीय समितीचे गठन करण्यात आले होते. त्यानुसार सदर समितीचे अध्यक्ष यांनी उक्त प्रादेशिक योजनेमध्ये कलम २० अन्वये करावयाच्या फेरबदलाबाबत शासनास अहवाल सादर केला आहे. या अहवालास शासनाने दिनांक २६ ऑक्टोबर २०२३ अन्वये तत्त्वत: मान्यता प्रदान केली असून सदरच्या प्रकरणामध्ये छाननी समितीच्या स्तरावरून कार्यवाही करणेबाबत निदेश दिले आहेत.

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त प्रादेशिक योजनेमधील मौजे टोप, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील गट नंबर २८३, २९३, २९४, २९५, २९६, २९८, २९९, ३००, ३०१ मधील प्रस्तावित २४.०० मी. रुंद प्रादेशिक योजना रस्त्याची आखणी गट नंबर २८३, २९१, २९२, २९५, ३००, ३०१ या गटांमध्ये स्थलांतरित करणेस दिनांक २६ ऑक्टोबर २०२३ रोजीचे पत्रासोबतचे प्रपत्र - ड मधील अ.क्र. १ येथे तत्त्वत: मान्यता दिली आहे, या गटांमध्ये सदर रस्त्याची आखणी स्थलांतरित करतेवेळी उक्त गटांसोबतच गट नंबर २९२ सुद्धा बाधित होणार आहे.

सबब, उक्त २४.०० मी. रुंद प्रादेशिक योजना रस्त्याची आखणी मौजे टोप, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील गट नंबर २८३, २९३, २९४, २९५, २९६, २९८, २९९, ३००, ३०१ मधून गट नंबर २८३, २९१, २९२, २९५, ३००, ३०१ या गटांमध्ये स्थलांतरित करून प्रादेशिक योजना रस्त्याखालील क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करणे आवश्यक आहे. (यापुढे ज्यास "उक्त फेरबदल" असे संबोधले आहे).

आणि ज्याअर्थी, सूचना क्रमांक प्रा.यो.कोल्हापूर/मौ.टोप/ता.हातकणंगले/२४ मी. रुंद प्रा.यो.रस्ता/कलम २० *(४)*/सहसंपुवि/३३८, दिनांक १० मार्च २०२५ अन्वये, उक्त २४.०० मी. रुंद प्रादेशिक योजना रस्त्याची आखणी मौजे टोप, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील गट नंबर २८३, २९३, २९४, २९५, २९६, २९८, २९९, ३००, ३०१ मधून गट नंबर २८३, २९१, २९२, २९५, ३००, ३०१ या गटांमध्ये स्थलांतरित करून प्रादेशिक योजना रस्त्याखालील क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करणेबाबत राजपत्रात व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या उक्त अधिनियमाच्या कलम २० *(३)* अन्वयेच्या सूचनेस अनुसरून प्राप्त होणाऱ्या सूचना / हरकतींवर संबंधितांना सुनावणी देऊन अहवाल सादर करणेकरिता सहायक संचालक, नगर रचना, कोल्हापूर शाखा, कोल्हापूर यांना नियुक्त करण्यात आले होते. (यापुढे ज्यास "उक्त अधिकारी" असे संबोधले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने संपूर्ण वैधानिक कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून, सदर फेरबदलाबाबत विहित मुदतीत एकही हरकत / सूचना प्राप्त झाली नसल्याचे उक्त अधिकारी यांनी कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिकारी यांचे अभिप्राय दिनांक १६ जून २०२५ रोजीचे प्रस्ताव छाननी समितीच्या बैठकीत विचारात घेऊन सोबतच्या नकाशात दर्शविल्यानुसार व काही अटी सापेक्ष उक्त २४.०० मी. रुंद प्रादेशिक योजना रस्त्याच्या आखणीत बदल करणेचा निर्णय "प्रस्ताव छाननी समिती" चे बैठकीमध्ये झालेला आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्यात मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांमध्ये उक्त अधिनियमाचे कलम २० अन्वये वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या फेरबदलासंदर्भाने करावयाच्या कार्यपद्धतीबाबत उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये शासन निर्णय क्र. टीपीएस-१८१५/प्र.क्र.४९/१५/नवि-१३, दिनांक ६ मे २०१५ व दिनांक ४ जानेवारी २०१६ अन्वये शासनाने निर्देश दिलेले आहेत, (यापुढे ज्यास "उक्त शासन निर्णय" असे संबोधले आहे) व त्याअनुषंगाने शासनाने "प्रस्ताव छाननी समिती" गठीत केली आहे ;

आता त्याअर्थी, शासनाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार, सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे हे उक्त अधिनियमाचे कलम २० पोट-कलम ४ अन्वये उक्त प्रस्तावित फेरबदलास मंजुरी देत आहेत आणि त्यासाठी उक्त प्रादेशिक योजना मंजुरीच्या दिनांक ४ जानेवारी २०१८ च्या अधिसूचनेसोबत जोडलेल्या फेरबदलाच्या अनुसूचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर, खालीलप्रमाणे बदलाची नोंद घेण्याचे निदेश देत आहे.

नोंद

मौजे टोप, तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील गट नंबर २८३, २९३, २९४, २९५, २९६, २९८, २९९, ३००, ३०१ मधील प्रस्तावित २४.०० मी. रुंद प्रादेशिक योजना रस्त्याची आखणी गट नंबर २८३, २९१, २९२, २९५, ३००, ३०१ या गटांमध्ये सोबतच्या भाग नकाशात दर्शविल्यानुसार स्थलांतरित करणेत येत आहे.

मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा, सहायक संचालक, नगर रचना, कोल्हापूर शाखा, कोल्हापूर यांचे कार्यालयात, नागरिकांच्या अवलोकनार्थ कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.

प्रस्तुत अधिसूचना www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

रा. म. पवार,
सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती
तथा सहसंचालक, नगर रचना,
पुणे विभाग, पुणे.

पुणे, २५ जून २०२५.

BY MEMBER SECRETARY, PROPOSAL SCRUTINY COMMITTEE AND JOINT DIRECTOR OF TOWN PLANNING, PUNE DIVISION

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

NOTIFICATION

No. R.P.Kolhapur/ Mou.Top/Tal.Hatkanangale/24 mtrs.R.P. Road/Section 20 *(4)*/JDTP/ 882/2025.– Whereas, The Government has sanctioned the Regional Plan for Kolhapur District on dated 4th January 2018 (hereinafter referred to as “the said Regional Plan”) under the provisions of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as “the said Act”) and has came into force with effect from dated 1st April 2018 ;

and whereas, the Government had noticed that the objections of most of the citizens who have taken suggestions / objections were not properly resolved due to improper hearing by the Planning Committee hence Government, has appointed Three Members Committee *vide* decision dated 3rd April 2018 to suggest modifications in said Regional Plan to Government under Section 20 of the said Act ;

and whereas, the Chairman of the said committee has submitted a report to the Government regarding the modification to be made under Section 20 of the said Act in the said Regional Plan, Which is approved by Government *vide* letter dated 26th October 2023 and directed to proceed accordingly in such matters on the level of Scrutiny Committee ;

and whereas, Government has approved to shift the alignment of 24.00 mtrs. wide Regional Plan road in Mouje Top, Taluka Hatkanangale, District Kolhapur from Survey Nos. 283, 293, 294, 295, 296, 298, 299, 300, 301 to the Survey Nos. 283, 291, 292, 295, 300, 301 by letter dated 26th October 2023;

and whereas, it is necessary to shift the alignment of 24.00 mtrs. wide Regional Plan road in Mouje Top, Taluka Hatkanangale, District Kolhapur from Survey Nos. 283, 293, 294, 295, 296, 298, 299, 300, 301 to the Survey Nos. 283, 291, 292, 295, 300, 301 and land there under released is to be included in Adjacent Zone. (hereinafter referred to as “the said Modification”) ;

and whereas, Notice No. R.P.Kolhapur/Mou.Top/Tal.Hatkanangale/24mtrs.R.P. Road/Section 20*(3)*/ JDTP/338, dated 10th March 2025 has been published under Section 20 *(3)* of the said Act, for inviting suggestions and objections, for Shifting the said Road Alignment and Include the area thereunder in Adjacent Zone and authorised the Assistant Director of Town Planning, Kolhapur Branch, Kolhapur (hereinafter referred to as the “said Officer”) to submit a report after giving hearing to the suggestions / objections so received in response to the Notice under Section 20 *(3)* of the said Act, to be published in Maharashtra Government Gazette as well as local news papers ;

and whereas, the said Officer had submitted a report stating that all legal procedure stipulated in the said Act has been completed and no suggestions / objections has been received within the stipulated period about the said Modification ;

and whereas, after considering the report submitted by the said Officer, the Proposal Scrutiny Committee in its meeting dated 16th June 2025 has made a decision to Shift the Alignment of the said Road and include the area thereunder in the Adjacent Zone as shown on plan subject to certain conditions;

and whereas, the Government *vide* Resolution No. TPS-1815/C.R.-49/15/UD-13, dated 6th May 2015 and dated 4th January 2016 (hereinafter referred to as “the said Government Resolution”) has issued the directives under Section 154 of the said Act, regarding the procedure to be followed under Section 20 of the said Act, for making changes in the use of land in the areas of sanctioned Regional Plans, and for that purpose constituted “Proposal Scrutiny Committee”.

Now therefore, under the powers delegated by the Government, the Joint Director of Town Planning, Pune Division, Pune hereby sanctions the Modification under sub-section 4 of Section 20 and for that purpose directs that in the Schedule of Modifications appended to the Notification dated 4th January 2018 sanctioning the said Regional Plan, after the last entry, the following new entry shall be added ;

ENTRY

In the Sanctioned Regional Plan of Kolhapur, the Alignment of 24 mtrs. wide R.P. Road Passing through Survey Nos. 283, 293, 294, 295, 296, 298, 299, 300, 301 is Shifted into Survey Nos. 283, 291, 292, 295, 300, 301 as Shown on Plan.

The Part Plan showing the sanctioned Modification shall be made available for inspection to the general public, in the office of Assistant Director of Town Planning, Kolhapur Branch, Kolhapur.

This Notice is also available on website **www.dtp.maharashtra.gov.in.**

R. M. PAWAR,

Member Secretary, Proposal Scrutiny Committee
and Joint Director of Town Planning,
Pune Division, Pune.

Pune, 25th June 2025.

जिल्हाधिकारी यांजकडून

जिल्हा सातारा

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ पोट-कलम (१) *अन्वये*

प्रारंभिक अधिसूचना

क्रमांक भूसं/२१/कृखो/एस.आर.नं.२७०/२०१९.— ज्याअर्थी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड *(इ)* च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय, अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण-११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(झेड ऐ)* मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, जिल्हाधिकारी, सातारा यांना यासोबत जोडलेल्या अनुसूची - एकमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची - दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ पोट-कलम *(१)* च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनींची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची - तीनमध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची - चारमध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम *(१)* अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची - पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४ नुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनींचा अथवा तिच्या भागांचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनींवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु उक्त जमिनींच्या अथवा तिच्या भागांच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(५)* अनुसार जिल्हाधिकारी, भूसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उपनियम *(३)* द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचेदेखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) क्र. २१ (कृखो), सातारा यांना पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

जिल्हा सातारा, तालुका फलटण, गाव सासकल

अ.क्र.	भूमापन किंवा गट क्रमांक	अंदाजित क्षेत्र (हे.आरमध्ये)	चतु:सीमा			
			पूर्व	पश्चिम	दक्षिण	उत्तर
१	४४९	०.०६	भाडळी खुर्द शीव	४५१	४४८, ४४६	४५०
२	४४८	०.३८	भाडळी खुर्द शीव	४४६	४४७	४४९
३	४४७	०.१५	भाडळी खुर्द शीव	४४६	४४६	४४८
४	४४६	०.२३	४४७, ४४८	४४५	४३३	४५१, ४५२
५	४१२	०.०३	४११	४१३	४११	४४६

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- धोम-बलकवडी प्रकल्प, तालुका फलटण, जिल्हा सातारा.

प्रकल्प कार्याचे वर्णन :- धोम बलकवडी प्रकल्पांतर्गत धोम-बलकवडी उजवा कालवा वितरिका सासकल सा.क्र. १२४/७८० अन्वये कालव्याद्वारे शेतजमिनीस पाणीपुरवठा करणे.

समाजाला मिळणारे लाभ :- अ) धोम-बलकवडी प्रकल्पांतर्गत धोम-बलकवडी उजवा कालवा वितरिका व लघुवितरिका या योजनेद्वारे फलटण तालुक्यातील १२७५० हेक्टर दुष्काळी क्षेत्रास सिंचन लाभ होणार आहे.

ब) या योजनेअंतर्गत फलटण तालुक्यातील अवर्षणग्रस्त गावांना सिंचनाचा लाभ मिळून आर्थिक व सामाजिक विकास होणार आहे.

क) या योजनेमुळे सासकल या गावचे क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

अनुसूची - तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे प्रस्तावित संपादनामुळे बाधित व्यक्तींचे विस्थापन होत नाही.

अनुसूची - चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाया अभिकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निधीचा सारांश)

महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग मंत्रालय, मुंबई-३ यांचेकडील पत्र क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.६२/अ-३, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ६ फेब्रुवारी २०१९ अन्वये, धोम-बलकवडी प्रकल्पास केंद्रीय जल आयोगाची मान्यता प्राप्त झाली असून त्यावेळी पर्यावरण आघात अभ्यास (Environment Impact Analysis) झाला असल्याने नवीन भूसंपादन अधिनियम, २०१३ चे कलम ६ *(२)* खालील परंतुकामधील तरतुदींच्या अनुषंगाने धोम-बलकवडी प्रकल्पास उक्त भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील प्रकरण दोनमध्ये नमूद सामाजिक परिणाम निर्धारण (Social Impact Assessment) ची आवश्यकता नसल्याने त्यापासून सूट देणेत आलेली आहे.

अनुसूची - पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम :- लागू नाही.

ब. प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- प्रश्न उदभवत नाही.

क. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अधिसूचनेचा तपशील :- प्रश्न उदभवत नाही.

टीप :- उक्त जमिनींच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) क्र. २१, (कृखो), सातारा, पत्ता - भूमी संपादन भवन, सदर बझार, सातारा, कोषागार कार्यालयासमोर या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

संतोष पाटील,
जिल्हाधिकारी, सातारा.

सातारा, १३ मे २०२५.

जिल्हाधिकारी यांजकडून

जिल्हा कोल्हापूर

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये

अधिसूचना

क्रमांक उ.वि.अ.इचल./भूसंपादन/जयसिंगपूर/एस.आर.-१८५/२०२५.— ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या कोल्हापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांचेमार्फत उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी उपविभाग, इचलकरंजी यांनी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, अधिसूचना क्रमांक उ.वि.अ.इचलकरंजी/भू.सं./एसआर-१८५/२०२५, दिनांक ४ मार्च २०२५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे व ती महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक--पुणे विभागीय पुरवणी, मार्च १३ - १९, २०२५, मध्ये प्रसिद्ध झाली आहे. त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची, अनुसूची दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी उपविभाग, इचलकरंजी यांचेकडे कलम १५ च्या पोट-कलम *(२)* अन्वये कोणत्याही खातेदारांनी आक्षेप नोंदविलेला नाही. उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम *(१)* च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनींची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन, पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून "निरंक" निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी उपविभाग, इचलकरंजी यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

संपादित करावयाच्या जमिनींचे वर्णन

जिल्हा कोल्हापूर, तालुका शिरोळ, गावाचे नाव मौजे जयसिंगपूर,

अ.क्र.	भूमापन किंवा गट नंबर	अंदाजित क्षेत्र (हे. आर)
१	२	३
१	जुना गट नं. १८७/१-ड/१, नवीन गट नं. १३३/५ पैकी.	०.६६

अनुसूची - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- दूधगंगा मोठा पाटबंधारे प्रकल्प, तालुका राधानगरी, जिल्हा कोल्हापूर.

प्रकल्प कार्याचे वर्णन :- मौजे जयसिंगपूर, तालुका शिरोळ येथील जमिनींचे दूधगंगा प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनासाठी संपादन करणे.

समाजाला मिळणारे लाभ :- सिंचनाखालील क्षेत्र वाढेल व लोकांचा आर्थिक व सामाजिक स्तर विकसित होणार होईल. लाभक्षेत्रातील गावांमध्ये पाणीटंचाई दूर होणार आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक राहणीमान सुधारल्यामुळे ते सर्व लोक नागरी सुविधा मिळविण्याबाबत सक्षम होणार आहेत. ऊसासारखी नगदी पिके घेतल्यामुळे साखर कारखान्यासारख्या औद्योगिक क्षेत्रामध्ये वाढ होऊन विकास होणार आहे.

अनुसूची - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

दूधगंगा प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनासाठी मौजे जयसिंगपूर, तालुका शिरोळ येथील शासनाने ताबा घेतलेल्या जमिनींचे संपादन करणेत येत आहे. सबब याद्वारे गावठाणे विस्थापित होत नाहीत.

अनुसूची - चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सांराश

प्रस्तावित संपादन क्षेत्रामध्ये फक्त शेतजमीन येत असून गावठाण विस्थापित होत नसल्याने पुनर्वसाहत क्षेत्राबाबत तपशील "निरंक" आहे,

टीप :- उक्त जमिनींच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी उपविभाग, इचलकरंजी या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

अमोल येडगे (भा.प्र.से.),

कोल्हापूर. १२ जून २०२५. जिल्हाधिकारी कोल्हापूर.

जिल्हाधिकारी यांजकडून

जिल्हा सोलापूर

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याच्या व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ (१)

अधिसूचना

क्रमांक २०२३/भूसंपादन/कार्या-१/एसआर/०४/आरआर-१६३०/२०२५.—ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या सोलापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोटकलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली अधिसूचना महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण-११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची, अनुसूची दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, सोलापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी, कलम १५ च्या पोटकलम *(२)* अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, त्याबाबत त्यांची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम *(१)* च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनींची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुर्नवसाहत योजनेचा सारांश अनुसूची चारमध्ये विनिर्दिष्ट केले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी सचिन इथापे, उपविभागीय अधिकारी, पंढरपूर विभाग, पंढरपूर यांस पदनिर्देशित करीत आहे.

परिशिष्ट - एक

जमिनीचे वर्णन

जिल्हा सोलापूर, तालुका पंढरपूर, गावाचे नाव शेगाव दुमाला

अ. क्र.	गट नंबर	संपादन करावयाचे क्षेत्र (चौ.मी.)	अ. क्र.	गट नंबर	संपादन करावयाचे क्षेत्र (चौ.मी.)
१	२	३	१	२	३
१.	३०	११००	२०.	१८	६७
२.	३१	२२८०	२१.	१७	००
३.	३६	६००	२२.	१६	६७

परिशिष्ट - एक--*चालू*

१	२	३	१	२	३
४.	३७	५८०	२३.	४२	११७५
५.	३९	२९०	२४.	४५	७३६
६.	४०	२५०	२५.	९७	००
७.	४१	३४५	२६.	९८	४७५
८.	४६	२३४	२७.	१०२	११९६
९.	४७	२१८	२८.	१११	७५४
१०.	५१	२४४	२९.	११२	००
११.	५२	१००	३०.	१३१	२८२
१२.	५३	४१७९	३१.	९४	२७४
१३.	५४	३०९४	३२.	१३३	३४१
१४.	२९	१७०.५	३३.	१४७	१८७८
१५.	२७	१०८	३४.	१४६	३७०
१६.	२५	७७	३५.	१५३	२५
१७.	२१	६२	३६.	१५४	१०९
१८.	२०	८०	३७.	१४४	४८९
१९.	१९	२५७	३८.	२६	९१

परिशिष्ट - दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- शेगाव दुमाला, तालुका पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथील हिंदू स्मशानभूमीजवळ चंद्रभागा नदीवर जोड रस्त्यासह मोठ्या पुलाचे बांधकामाकरिता.

प्रकल्पाचे विवरण :- शेगाव दुमाला, तालुका पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथील हिंदू स्मशानभूमीजवळ चंद्रभागा नदीवर जोड रस्त्यासह मोठ्या पुलाचे बांधकामाकरिता.

परिशिष्ट - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

जिल्हा सोलापूर, तालुका पंढरपूर, गावाचे नाव शेगाव दुमाला

अ. क्र.	भूमापन क्रमांक किंवा गट नंबर / सर्व्हे नंबर	क्षेत्र (हेक्टर / चौ.मी.मध्ये)
निरंक	निरंक	निरंक

पुनर्वसाहत करण्याची आवश्यकता नाही, सबब माहिती निरंक.

परिशिष्ट - चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)

दिनांक १३ मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिद्ध महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्रमांक संकीर्ण-१/२०१५/प्र.क्र.३/अ-२ नुसार उक्त नियमाचे कलम १०-क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे.

टीप.-- उक्त जमिनींच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, पंढरपूर विभाग, पंढरपूर यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

कुमार आशीर्वाद (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, सोलापूर.

सोलापूर, ६ जून २०२५.

उपजिल्हाधिकारी यांजकडून

जिल्हा सातारा

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३

अधिसूचना – कलम ११

क्रमांक भूसं-४/एसआर-८७७/कावि-७१०/२०२५.— ज्याअर्थी, मौजे विचुर्णी, तालुका फलटण, जिल्हा सातारा एस.आर. क्रमांक ८७७ येथील जमिनींचे संपादन करणेच्या संबंधात भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड *(इ)* च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(झेड ऐ)* मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

